




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ३०.०६.२०२५ | अंक नं. ७८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










## भजनाच्या कार्यक्रमास गेलेल्या महिलेचे घर फोडून चोरट्यांनी सोन्याच्या दागिनांसह रोकड केली लंपास

नगर – भजनाच्या कार्यक्रमास गेलेल्या महिलेच्या बंद घराच्या बेडरुमच्या खिडकीची लोखंडी जाळी तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत सामनाची उचकापाचक करुन घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरुन नेल्याची घटना बालिकाश्रम रोडवरील सुडके मळा येथील बँक ऑफ बडोदा कॉलनी मध्ये २८ जून रोजी सायंकाळी घडली.

याबाबत मंगला कृष्णाजी केळकर (वय ७४, रा. बँक ऑफ बडोदा कॉलनी, सुडके मळा, बालिकाश्रम रोड, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या घरात एकट्या राहतात. २८ जून रोजी दिल्लीगेट येथे भजनाचा कार्यक्रम असल्याने सायंकाळी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास फिर्यादी या त्यांच्या घराच्या दरवाजास व्यवस्थित कुलूप लावून भजनाच्या कार्यक्रमास गेल्या. भजनाचा कार्यक्रमावरुन सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास त्या घरी गेल्या. त्यांनी घराचे कुलूप उघडून आत प्रवेश केला असता त्यांना घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. तसेच बेडरुम मधील कपाट उघडे दिसले आणि बेडरुमची खिडकी उघडी असून खिडकीची जाळी तुटलेली दिसली.

फिर्यादी यांनी कपाट तपासले असता कपाटातील लॉकर मधील ७० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या बांगड्या, ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप्स, १ ग्रॅम वजनाच्या तीन व अर्धा ग्रॅम वजनाच्या दोन अशा एकूण ५ सोन्याच्या वेढन्या, आणी ४ हजार रुपये रोकड असा ऐवज मिळून आला नाही. यावरुन फिर्यादी या भजन कार्यक्रमास गेलेल्या असता अज्ञात चोरट्याने बेडरुम च्या खिडकीची जाळी तोडून आत प्रवेश करून चोरी केल्याची खात्री झाली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात मंगला केळकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बसस्थानकातून महिलेच्या गळ्यातील दागिन्याची चोरी

नगर – शहरातील स्वस्तिक बसस्थानक परिसरात प्रवासासाठी आलेल्या महिलेच्या गळ्यातील दीड तोळे वजनाचे सोन्याचे मिनीगंठण गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना २९ जून रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत विजया शांतीलाल मुथा (वय ६३, रा. साईश्रध्दा अपार्टमेंट, इलाक्षी शोरुम मागे, अ.नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांचे पती शांतीलाल मुथा यांचेसह २९ जून रोजी पुणे येथे जाण्यासाठी स्वस्तिक बसस्थानक येथे आल्या होत्या. दरम्यान, दुपारी तीनच्या सुमारास परभणी पुणे बस आल्याने त्या बसमध्ये बसण्यासाठी गर्दीतून आत प्रवेश करीत असताना त्यांच्या गळ्यातील सुमारे दीड तोळे वजनाचे सोन्याचे मिनीगंठण गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने नजर चुकवून चोरुन नेले.

गळ्यातील गंठण चोरी गेल्याचे लक्षात येताच फिर्यादी व त्यांच्या पतीने बसमध्ये व बसस्थानक परिसरात शोधाशोध केली, मात्र मिनीगंठण कोठेही मिळून आले नाही. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने हे गंठण चोरल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात विजया मुथा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## एटीएम फोडण्याचा प्रयत्न; अल्पवयीन मुलांना पकडले

नगर – सावेडीच्या भुतकरवाडी परिसरात ए.टी.एम. मशिन फोडून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची घटना समोर येताच तोफखाना पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावत दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. त्यांनी अधिक पैसे मिळवण्याच्या उद्देशाने गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

भुतकरवाडी येथील खंडेलवाल हॉस्पिटलसमोर असलेल्या इंडिया वन कंपनीच्या ए.टी.एम. मशिनचे मेन दरवाजाचे लॉक तोडून चोरट्यांनी प्रवेश केला. त्यांनी मशिनचे डिजिटल लॉक उघडण्याचा प्रयत्न केला, तसेच सुरक्षेसाठी लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या वायर कापून ते निष्क्रिय केले. ही घटना २५ जून रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास घडली होती.

ए.टी.एम. मशिन फोडण्याचा प्रयत्न करताना मशिनचे आणि इतर वस्तूंचे मोठे नुकसान करण्यात आले. या प्रकरणी आरीफ मंगतुद्दीन खिलजी (वय ५०, रा.गजानन कॉलनी, नवनागापूर) यांच्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाच्या गांभीर्याची दखल घेत पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे २४ तासांत गुन्हा उघडकीस आणण्यात आला.

पोलिसांनी या गुन्ह्यामागे दोन अल्पवयीन बालकांचा सहभाग असल्याचे निष्पन्न केले. दोघांना पालकांच्या समक्ष ताब्यात घेऊन चौकशी केली असता, अधिक पैसे मिळवण्याच्या उद्देशाने गुन्हा केल्याची कबुली त्यांनी दिली आहे.

ही कारवाई पोलिस अंमलदार गोपीनाथ गोर्डे, सुनील चव्हाण, योगेश चव्हाण, सुधीर खाडे, सुमित गवळी, सुजय हिवाळे, सतिष त्रिभुवन, कपील गायकवाड, बाळासाहेब भापसे, सतिष भवर, भागवत बांगर, अविनाश बर्डे यांच्या पथकाने केली.












# गृहिणी

## आरोग्य

### दालचिनी आणि मधाचे फायदे

मध आणि दालचिनी जेव्हा या दोन्ही गोष्टी एकत्र वापरल्या जातात तेव्हा त्यांचे फायदे आणखी वाढतात. दालचिनी आणि मध या दोन्हींमध्ये नैसर्गिक अँटीव्हायरल आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आहेत. याचा अर्थ ते आपल्याला अनेक प्रकारच्या संसर्गापासून वाचवू शकतात. जेव्हा हे दोन्ही एकत्र केले जातात तेव्हा आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती खूप मजबूत होते. दालचिनी शरीराला ऊर्जा देते आणि मधातील नैसर्गिक साखर त्वरित ऊर्जा प्रदान करते. म्हणून, जर तुम्हाला थकवा जाणवत असेल तर ते तुम्हाला ताजेतवाने करू शकते. जर तुम्हाला सर्दी किंवा ताप असेल तर दिवसातून दोनदा मधात दालचिनी मिसळून घेतल्याने खूप आराम मिळतो. त्याचा तुमच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. मधुमेही रुग्णांसाठी, ते रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकते.

## पाककला

### आंब्याची रसमलाई

**साहित्य :** दूध – एक लिटर फुल क्रीम, लिंबाचा रस – दोन टेबलस्पून, पाणी – एक कप, आंब्याचा गर – एक कप, साखर – चार टेबलस्पून, केसर – गरम दुधात भिजवलेले, वेलची पूड – अर्धा टीस्पून, चिरलेला पिस्ता आणि बदाम

**कृती :** सर्वात आधी दूध उकळवा, नंतर गॅस बंद करा आणि हळूहळू त्यात लिंबाचा रस घाला. जेव्हा दूध दही होऊन चक्का वेगळे होते तेव्हा ते मलमलच्या कपड्यात गाळून घ्या. त्याचा आंबटपणा दूर करण्यासाठी ते थंड पाण्याने धुवा आणि नंतर पाणी पिळून ३० मिनिटे लटकवा. नंतर चक्काला चांगले मॅश करा आणि गुळगुळीत करा आणि लहान टिक्की बनवा. आता पाणी आणि साखर उकळवा आणि त्यात तयार केलेले चक्का टिक्की घाला. झाकण ठेवून मध्यम आचेवर दहा मिनिटे शिजवा. शिजल्यानंतर, टिक्की थंड होऊ द्या आणि नंतर हलके दाबा आणि सिरप काढा. आता पुन्हा एक लिटर दूध घट्ट होईपर्यंत उकळवा, नंतर त्यात केशर, वेलची पूड आणि साखर घाला. ते थंड झाल्यावर त्यात आंब्याचा लगदा घाला. गरम दुधात आंब्याचा लगदा घालू नका नाहीतर तो दही होऊ शकतो याची काळजी घ्या. आंब्याच्या रबडीमध्ये चक्का टिक्की घाला. आता चिरलेले काजू आणि पिस्ता घाला. व काही तास फ्रीजमध्ये ठेवा. तयार आंब्याची रसमलाई सर्व्ह करा.

## वास्तू

* तुळशीच्या झाडापाशी जर पाल दिसली तर धनलाभ व समृद्धीचे संकेत आहेत असे समजावे. घरात आनंद, सुख, समृद्धी येणे मानले जाते. सकारत्मक ऊर्जा वाढते व चांगल्या वेळेच प्रतिक मानले जाते.

* स्वयंपाक घरातील मीठ संपत आले की लगेच नवीन भरणा करावा. मीठ संपल्यास घरामधील लोकांमध्ये मतभेद वाढतात.

* कोरफडीमध्ये नकारात्मक ऊर्जा खेचून घेण्याचे गुण असतात. जर तुमच्याकडे कोरपड असेल तर, त्याचे एक पान घेऊन नजर लागलेल्या व्यक्तिवरुन सात वेळा उतरायचे आणि ते कचरा कुंडीत टाकून द्यायचे.

## सल्ला

पनीर भाजी हॉटेल सारखी टेस्टी हवी असेल तर भाजी करताना त्यात एक चमचा पावभाजी मसाला टाकावा.

## सौंदर्य

रक्ताभिसरण व्यवस्थित होण्यासाठी कमीत कमी १०० वेळा केसांत कंगवा फिरवणे आवश्यक आहे. विंचरताना केसांतील गुंता प्रथम बोटांनी सोडवावा. केस विंचरताना पुढे वाकून केस चेहऱ्यावर आणा आणि मानेपासून केसांच्या टोकापर्यंत केस विंचरा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १ जुलै २०२५

**--, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, पूर्वा ०८।५४, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. शत्रू प्रभावहीन पडतील. आरोग्य उत्तम राहील.

**वृषभ :** सामाजिक क्षेत्रातील लोकांना दिवस अनुकूल आहे. एखाद्या लांबच्या प्रवासाला जावेल लागेल.

**मिथुन :** एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल. गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल.

**कर्क :** मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. मातृपक्षाकडून सहयोग मिळेल. व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**सिंह :** भाऊबंद डोके वर काढतील. आनंदाची बातमी मिळेल. मुलांच्या मनोरंजनासाठी खर्च होईल.

**कन्या :** वैवाहिक जीवनात स्थिती अनुकूल राहील. अधिकारी वर्गाचे पाठबळ मिळेल. हितशत्रू पराभूत होतील. राजकारणी लोकांसाठी चांगला दिवस.

**तूळ :** अडचणी येण्याची शक्यता आहे. कामात गलथानपणा कराल. मोठ्यांचा आधार मिळाल्याने कार्य पूर्ण होतील.

**वृश्चिक :** मित्रांची मदत मिळेल. आरोग्यविषयक समस्या निर्माण होतील. व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील.

**धनु :** ति श्रम करावे लागतील. व्यापार-व्यवसाय व आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगावी लागेल.

**मकर :** घरात किंवा पैशांमध्ये वाढ झाल्याने आपणास आनंद मिळेल. आपला निष्काळजी दृष्टीकोन नुकसानदायक ठरेल.

**कुंभ :** व्यापारात नुकसान होईल. एका कामात अवनती झाली तर दुसऱ्या कामात लाभही होण्याची शक्यता आहे.

**मीन :** आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढेल. धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूलता येईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२१० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | | ५ |
| | ■ | ६ | | ७ | | ■ | |
| ८ | ९ | | ■ | १० | | ११ | |
| ■ | | ■ | १२ | ■ | १३ | | ■ |
| १४ | | ■ | १५ | १६ | | ■ | १७ |
| ■ | ■ | १८ | | | ■ | १९ | |
| २० | | | | ■ | २१ | | |
| | ■ | २२ | | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) अचानक; आकस्मिक ४) काख ६) पाताळ ८) लहान मूल १०) घराचा मधला भाग १३) शक्ती; जोर; ताकद १४) मधाच्या पोळ्यातील चिकट पदार्थ १५) विवाहयोग्य मुलगी; वधू १८) न तुटता; सलग १९) बगीचा; उद्यान; उपवन २०) बोजड; मोठा २१) सह्याद्री पर्वताच्या पश्चिमेस समुद्राकाठी जी अरुंद व लांब जमिनीची पट्टी आहे ती २२) घडण; रचना; नकली

**उभे शब्द :-** १) आश्चर्य; नवल २) आठवण रहावी म्हणून उभे केलेले एखादे कार्य ३) त्या प्रकारचा; तसला ४) जबरदस्ती ५) लाट; तरंग ७) फिकीर; पर्वा ९) उग्र वासाचा एक कंद जो फोडणीसाठी वापरला जातो ११) डोंगर वगैरेतील खोलगट जागा १२) अपमान; अवमान; पाणउतारा १६) एक झाड; वटवृक्ष १७) मराठीत कॉम्प्युटर १८) आश्चर्यकारक; नवलाचे १९) शाळेत विद्यार्थ्यांना बसण्यासाठीचे एक लाकडी आसन २०) शेवट; अंत; अखेर २१) पुरुषाचा एक प्रकारचा जाड अंगरखा

### शब्दगंध क्र. ७२०९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पा | ल | खी | ■ | सा | मा | जि | क |
| नि | ■ | र | सा | य | न | ■ | स |
| प | त | ■ | पा | क | ■ | ■ | द्वा |
| त | मा | शा | ■ | ल | ठां | ब | र |
| ■ | ल | क | वा | ■ | ग | र | ■ |
| बा | प | ■ | व | डा | ■ | का | पा |
| प | त्र | का | र | ■ | बे | ■ | प |
| ट | ■ | या | ■ | रा | त | रा | णी |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** पैशाने श्रीमंत असणारी माणसं पावला-पावलावर भेटतात पण मनाने श्रीमंत असलेली माणसं भेटण्यासाठी पावले झिजवावी लागतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### माणसाच्या शरीराचे कोणते अवयव आयुष्यभर वाढतात?

२५ वयापर्यंत माणसाचा शारीरिक, बौद्धिक विकास पूर्ण होतो. नखे, केस या गोष्टी आयुष्यभर वाढत असतात. पण हे अवयव नाहीत. केवळ शरीराचा भाग आहेत. अवयव २५ वयानंतर वाढत नाहीत. केवळ मानसिक स्थिती ही एकच गोष्ट अशी आहे की जी आयुष्यभर बदलत असते. सध्या शास्त्रज्ञ मानवी अवयव पाली सारखी शेपटी तुटल्यावर वाढतील का? यावर काम करत आहेत. मानवी वाढ हा एक महत्वाचा व तितकाच गमतीदार घटक आहे. वाढ ही फक्त उभी होत नसून आडवी पण होते. वनस्पती व प्राणी यात ही आडवी वाढ होते ज्याला लॅटरल ग्रोथ म्हणतात, मानवात ही होते!

आपण संख्येने, आकाराने मोठे होण्यास वाढ समजतो. पण ताकद, अनुभव, अनुकूलन, विकास ही सुद्धा वाढच आहे. व्यायाम केल्यावर पेशी संख्येने वाढत नाहीत, आकाराने वाढतात. जास्त चरबी झाल्यावर पेशी सुद्धा आकाराने वाढतात. वजन वाढते पण ही फसवी वाढ. वाढता वाढता वाढे. वाढ व झीज यात थोडा फरक आहे. वाढ ही नैसर्गिक आहे. काही अवयव आणीबाणीच्या काळातच वाढतात. उदा. त्वचा.

पण जर आपले हाड मोडले तर तिथे नवीन हाड जुळून येते, एक अर्थाने ही वाढ पण ठराविक प्रसंगी. म्हणजे हाडे ही वाढतात. पूर्ण वाढ झाल्यावर एखाद्याने जड व्यायाम सुरू केला तर हाडाची घनता वाढते, मजबूत बनतात. हाडांचा ठिसूळपणा औषधे वापरुन कमी होतो. एक अर्थी ही सुद्धा वाढच. क्वचित प्रसंगी उंची वाढविण्यासाठी मांडीच्या हाडाची शस्त्रक्रिया केली जाते. आपली उंची सकाळी जास्त असते व संध्याकाळी झोपताना कमी. रात्रीत झीज भरून येते व काही मायक्रो मीटर उंची जास्त असते. याला वाढ म्हणायचे? हाडातील मगजपेशी, रक्त पेशी, सैनिक पेशी सतत वाढत असतात.

दुसरा एक महत्त्वाचा भाग जो सतत वाढतो कुर्चा. आपले नाक व कान कुर्चेने बनलेले असतात, जे सतत वाढतात. म्हातारपणी नाक व कान मोठे होतातच. दोन हाडातील कुर्चेही सतत वाढ होते. यकृत थोडा भाग कापल्यास तो वाढतो. केस व नखे आयुष्यात वाढतात व मेल्यावर सुद्धा काही मायक्रो मीटर वाढू शकतात.

मेंदू हा शारीरिकरित्या वाढला नाही तर अनुभव वाढत असतो. आपली प्रतिकार शक्ती सुद्धा एक प्रकारे वाढते, विकसित होते. जिवाणू, विषाणू चा हल्ला झाल्यास जुना अनुभव उपयोगी पडतो. खूप सारे संसर्गजन्य आजार, आयुष्यात एकदा होतात.

## सांबाची सूर्योपासना

सांब हा कृष्ण व जांबवती यांचा मुलगा होय. तो महाबलवान व दिसायला अतिशय सुंदर होता. स्वभावाने मात्र तो अत्यंत गर्विष्ठ होता. एकदा दुर्वास ऋषी हिंडत हिंडत द्वारकेस आले. त्यांचे शरीर अतिशय कृश व रूपही फारसे चांगले नव्हते. गर्विष्ठ सांबाने त्यांची नक्कल केली. त्यांच्याकडे बघून वेडावून दाखवले. त्यामुळे संतप्त होऊन दुर्वासांनी शाप दिला, की तुला स्वतःच्या रुपाचा गर्व आहे, कुरूप म्हणून तू माझी थट्टा केलीस तर तूही कुरुप, कुष्ठरोगी होशील. सांबाला शापाचे गांभीर्य कळले तरी त्याने फारसे मनाला लावून घेतले नाही, की वागणुकीतही काही बदल केला नाही.

याच वेळी त्रैलोक्यात सतत संचार करणारे नारदमुनी द्वारकेत आले. नारदमुनी सर्वांना वंदनीय होते, पण सांबाने मात्र आपल्या स्वभावानुसार त्यांचा अपमान केला. या उद्धटाला धडा शिकवून त्याला नम्र बनवायचे, असे नारदांनी ठरवले. ते श्रीकृष्णांना म्हणाले, सांब हा रूपाने अद्वितीय आहे. तुमच्या सोळा सहस्र नारी त्याच्या दर्शनासाठी उत्सुक असतात. एवढे बोलून नारद द्वारकेतून निघून गेले.

कृष्णाचा नारदाच्या बोलण्यावर विश्वास बसला नाही. पुन्हा काही दिवसांनी जेव्हा नारद द्वारकेत आले तेव्हा कृष्ण अंतःपुरात होता. नारदांनी सांबाला बळेच सांगितले, 'सांबा, तुझे वडील तुला हाक मारीत आहेत.'

नारदांवर विश्वास ठेवून सांब कृष्णाकडे गेला असता सर्व स्त्रिया सांबाकडे पाहत राहिल्या. हे पाहून श्रीकृष्ण रागावले. त्यांनी सांबाला शाप दिला, की तुझ्या रूपाकडे पाहून या स्त्रिया मोहित झाल्या. त्याला तू जबाबदार आहेस. तेव्हा तू कुरुप, कुष्ठरोगी होशील. वडिलांनी दिलेला शाप ऐकताच सांबाला दुर्वासांनी पूर्वी दिलेल्या शापाची आठवण झाली. शापानुसार सांब विद्रूप दिसू लागला. मग पश्चात्ताप होऊन तो पित्याला म्हणाला, आपण मजवर प्रसन्न व्हावे, या दोषापासून मी मुक्त होईन असे करावे. त्या वेळी कृष्णांनी त्याला सूर्योपासना करण्याचा उपदेश केला, तसेच त्यांनी त्याला नारदांना शरण जाण्यास सांगितले.

नारदांनी सांबाला सूर्यमाहात्म्य ऐकवले. मग पित्याची आज्ञा घेऊन सांब चंद्रभागा नदीच्या तीरी गेला व त्याने सूर्याची प्रखर उपासना केली. आपले रूप परत मिळवले. तेथे त्याने सूर्याची प्रतिष्ठापना करून सांबपूर नावाचे नगर वसवले. भजन-कीर्तनाची व्यवस्था करून नगर प्रजेला अर्पण केले व आपण द्वारकेस गेला.



## जीवन का अमृत (भाग १)

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

एक दूसरे के प्रति प्रेम और भक्ति भाव रखो, ताकि और लोग खुद-ब-खुद देखें कि आप एक जिंदा सतुगुरु से संबंध रखते हैं। याद रखो, हमारे कार्य, सुसज्जित भाषा में जोर देकर कही गई बात से कहीं ज्यादा बोलते हैं और असर करते हैं। एक ऐसे फूल की तरह जीना सीखों, जो जंगल में खिलता है और वातावरण को अपनी सुगंध से भर देता है।

आप यह पक्के तौर से जान लें कि आप हर लिहाज से दिव्य हैं और स्वयं अपने भाग्य को बनाने वाले हैं, जिसमें कि बहुत सी उच्च संभावनाएँ छुपी हैं। सिर्फ आपको बेहतर बनने की कोशिश करनी है और फिर अपने इरादे पर पक्का रहना है। बाकी सब कुछ अपने आप होगा, क्योंकि सतुगुरु आपके साथ है और आपको हर संभव सहायता, दया और संरक्षण प्रदान करेगा।

हम प्रभु को चापलूसी करके या बारबार झूटी बातें दोहराकर नहीं जीत सकते, ना ही हमारे प्रार्थना करने या न करने से उसे कोई फर्क पड़ता है। वह दयालु है और उसकी दया हर एक में, हर समय, समान रूप से कार्यरत है, क्योंकि उसके बिना हम जी नहीं सकते। पर अगर हम उसकी दया के सही पात्र बन जाएँ, तो अपने लाभ के लिए हम उसकी दया को आकर्षित कर सकते हैं।

नम्रता और भक्ति मन को शुद्ध बनाते हैं और इसे प्रभु की दया के योग्य कर देते हैं। इन दो सद्गुणों से मन के कमल को उल्टा करने में सहायता मिलती है, जो कि अभी इंद्रियों में लिप्त हैं। जब तक इसका रुख ऊपर की ओर न हो, इसमें प्रभु की दया सीधे प्रवाहित नहीं कर सकती। विनम्र और सच्ची प्रार्थना, मन और प्रभु की दया के बीच सामंजस्य स्थापित करने में सहायता करती है। इसके लिए केवल एक जिंदा और पवित्र हृदय की जरूरत होती है, जो कि उसकी दया के अनुकूल हो और प्रभु की दया अपने आप उस हृदय की ओर आकर्षित होगी। प्रार्थना में बहुत शक्ति होती है। यह इंसान को, जिंदगी की जंग निर्भीक होकर और सफलतापूर्वक लड़ने के लिए तैयार करती है और इंसान को मजबूत बनाती है। वास्तव में

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

पावन बन जाते हैं। हरेक व्यक्ति में विचार पैदा ही क्वनटम लेवेल पर हो रहे हैं। ये सारी प्रक्रिया पल में हो रही है और प्रत्येक व्यक्ति में हो रही है जिसे कोई जानता नहीं। ये सब अनजाने में हो रहा है। इस स्तर पर हमें शोध करनी है तब साइलेन्स की साइन्स पर विजय होगी।

आज्ञा चक्र -

२५ - मन- विचारों का प्रभाव

हर क्रिया की प्रतिक्रिया होती है। अग्नि जलती है तो उस से चार प्रतिक्रियाएं होती हैं। एक तो धुआं बनता है, दूसरा आस-पास का वातावरण गर्म होता है, तीसरा चारों ओर रोशनी फैलती है, चौथा जिस पदार्थ से अग्नि जलती है वह वस्तु नष्ट हो रही होती है। हमारा प्रत्येक विचार सात प्रकार से प्रतिक्रिया करता रहता है।

### आज्ञा चक्र

१) जिस के बारे में सोचते हैं हमारे विचार उन्हे हिट करते हैं अर्थात उस तक पहुंचते हैं।

२) प्रत्येक विचार हमारे संस्कारो में रेकोर्ड होता रहता है।

३) प्रत्येक विचार एक से तीन मिनिट के अन्दर शरीर की प्रत्येक कोशिका तक पहुंच जाता है और उसे प्रभावित करता है।

४) हमारा शरीर विचारों का स्थूल रूप है। हर संकल्प तरल रूप में परिवर्तित होता रहता है। हमारे मुख में जो थूक बनता है यही विचारो का स्थूल रूप है। अगर हम बुरे विचार करते हैं तो शरीर बीमारी से नष्ट होता है। अगर अच्छे विचार करते हैं तो शरीर हृष्ट पुष्ट बनता है।

५) वह व्यक्ति जो हमारे सब से नजदीक है चाहे वह घर हो या कारोबार की जगह हो, उन पर प्रभाव पड़ता है।

६) पिछले ८४ जन्मों में हमारे मां-बाप, सास-ससुर, पति-पत्नी या बेटा-बेटी थे उनके हम पूर्वज कहलाते हैं। वे लोग चाहे अब कहीं भी भिन्न भिन्न जन्मों में हैं और हम नहीं जानते कि वे कहां हैं, हमारा हर संकल्प अनजाने में उनको भी पहुंच रहा है और वह उसी अनुसार प्रेरित हो रहे हैं।

७) जिस परिवार, समूह, संघ, आफिस, दुकान, व्यापार, प्रशासक, नेता, मालिक, कर्मचारी, पुजारी व संस्था के आप मुखिया हैं वे सब लोग भी हमारे विचारों से प्रभावित होते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**पहिला मित्र :** काय रे, तू तर कर्जतमध्ये फ्लॅट घेणार होतास ना?

**दुसरा मित्र :** हो रे, पण सध्या मी कर्जात आहे ना

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतरत्न पुरस्कार मिळविणारी सर्वात कमी वयाची व्यक्ती कोण?
– सचिन तेंडुलकर (४० व्या वर्षी)

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

व आजी-आजोबांना घराबाहेर पडण्यास वाव द्यावा. यामुळे दोन्ही पिढ्यांनी एकमेकांना समजून घेऊन कामाची विभागणी केल्यास एकत्रितपणे सर्वजण मिळून मुलांचा सांभाळ करून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. शेवटी आजी-आजोबांच्या सान्निध्यात राहिलेल्या नातवंडांचे आरोग्य, संस्कार हे नक्कीच पाळणाघरात ठेवलेल्या मुलांपेक्षा आदर्श असतील, यात शंका नाही. नातवंडांमळे आजी-आजोबा व आई-बाबा यांच्यामधील वातावरण चांगले राहू शकते. फक्त त्यासाठी गरज आहे, की सर्वांनी आपला अहंकार बाजूला ठेवून मुलांचा सर्वांगीण विकास करणे व त्यातूनच कुटुंबाचा व पर्यायाने समाजाचा विकास करणे होय.

### पाळणाघर

-----------

आपल्या लहानपणी आपल्यावर संस्कार करण्यासाठी, वाढविण्यासाठी कधी पाळणाघराची गरज पडली नाही, कारण २५-३० वर्षांपूर्वीच्या काळी एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात होती आणि त्या वेळी अनेक माता या गृहिणी असायच्या. त्यामुळे मुलांचे संगोपन करण्यासाठी घराबाहेरच्या मंडळींचा आधार घेण्याची गरज पडत नव्हती. काका-काकू, आजी-आजोबा, आत्या, चुलत भावंडे यांच्या सान्निध्यात बालकांवर आपोआप संस्कार होऊन संगोपन होत असे. त्यामुळे मुलांच्या मनात कायम सुरक्षिततेची, प्रेमाची भावना असायची. मायेची ऊब त्यांना घरातील सदस्यांकडून मिळत असे. परंतु आजच्या काळातया मायेच्या उबेसाठी पाळणाघराची आवश्यकता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कारण सध्याच्या काळात वडिलांसोबत आईदेखील नोकरी वा व्यवसायाच्या निमित्ताने अर्थार्जनासाठी घराबाहेर पडत आहे.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००



निवृत्तीनाथ महाराज दिंडीचे अरणगाव येथे स्वागत करताना ग्रामस्थ.

## निवृत्तीनाथ महाराज दिंडीचे अरणगाव येथे स्वागत

नगर – सध्या आषाढी एकादशी काही दिवसांवर येऊन ठेपलेली असताना महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून विविध महाराजांच्या दिंड्या पंढरपूरच्या दिशेने रवाना होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील येवले तालुक्यातील विश्वगुरू निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा श्री साधू यशवंत देव मामलेदार महाराज पालखी सोहळा, श्री क्षेत्र सिद्धेश्वर मंदिर पिंपरी दिंडी विठू माऊलीच्या जयघोषात पंढरपूरच्या दिशेने जात आहे. श्री महंत ज्ञानेश्वर महाराज त्यागी यांच्या नेतृत्वाखाली ही दिंडी नगर तालुक्यातील दौंड रोडवरील अरणगाव येथे गुरूवार अर्जुन दामू शिंदे यांच्या वस्तीवर अल्पोपहारासाठी थांबली होती.

यावेळी परिसरातील नागरिकांनी दिंडीचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. यावेळी विजय शिंदे, रोहिदास शिंदे, सुनील निमसे, अमोल दळवी, बाळासाहेब दळवी, संतोष दळवी, भागीनाथ शिंदे, नामदेव दळवी, भानुदास देवकर, मच्छिंद्र भालसिंग, बाबा महाराज शिंदे, बबन महाराज दळवी, बबन दळवी, गोरख गहिले, अजयकुमार मिश्रा, नाना नाट, निरंजन दळवी, दत्ता नाट, बाबा दळवी, तारा शिंदे, अर्चना शिंदे, समंता शिंदे, छाया बोठे, शोभा भालसिंग, जया दळवी यांसह परिसरातील नागरिकांनी दिंडीच्या सहभागासाठी परिश्रम घेतले.

# चातुर्मासातील जपतप आराधना आत्मशुध्दीची अनुभूती देते

**अमित ज्योतीजी म.सा. यांचे प्रतिपादन**



अमित ज्योतीजी म.सा. यांचे महावीरनगर जैन स्थानकात स्वागत करण्यात आले.

नगर – सावेडी रोडवरील महावीरनगर येथील चंदनमल सुराणा (देहरेकर) जैन धर्मस्थानकातही चातुर्मासाची तयारी करण्यात आली आहे. श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्यावतीने चातुर्मासाचे नियोजन करण्यात आले आहे. यानिमित्त तत्वचिंतक महासाध्वी अमितज्योतीजी म.सा. यांचे स्थानकात आगमन झाले असून त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांच्यासमवेत संयमज्योतीजी म.सा., अनंत ज्योतीजी म.सा., नव दिक्षित अपूर्व ज्योतीजी म.सा. उपस्थित होत्या.

**महावीरनगर जैन स्थानकात स्वागत**

चातुर्मासानिमित्त साध्वीजींचे हॉटेल सांबार पासून स्वागत करण्यात आले. डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या मुली, युवती, महिला, राजस्थानी पगडी व सफेद वस्त्र परिधान केलेले श्रावक, पारंपरिक जैन नृत्य, जैन शांतीचा संदेश देणारे फलक, अमितज्योतीजी आये है, नई रोशनी लाये है. वेलकम वेलकम असा घोषणांनी वातावरण प्रफुल्लीत केले. यावेळी श्रावक संघाचे अध्यक्ष अनिल कटारिया, उपाध्यक्ष मिठुलाल मेहेर, दिनेश शिंगवी, सेक्रेटरी अशोक बलदोटा, कार्याध्यक्ष हिरालाल सुराणा, स्वागताध्यक्ष नरेंद्र बाफना, सतिष उर्फ बाबुशेठ लोढा, चातुर्मास कमिटीचे संजय सुराणा, सहसचिव धनराज संचेती, खजिनदार पोपटलाल कटारिया, सह खजिनदार विरेश कोठारी, चातुर्मास कमिटीचे उपाध्यक्ष चंद्रकांत राका, सन्मती महिला मंडळ, प्रमोद सखी मंडळ सदस्य आदींसह नगरधील तसेच इंदोर, मुंबई पुणे, टाकळी ढोकेश्वर, नाशिक, येथील श्रावक श्राविका उपस्थित होते. दीपाली सुराणा व अपेक्षा संकलेचा यांनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाची सर्व नियोजन व्यवस्था आनंद आशिष जाप मंडळ, महावीरनगर यांच्या वतीने करण्यात आली होती.

स्वागत करताना अनिल कटारिया म्हणाले की, महावीरनगर जैन स्थानकातील यंदाचा चातुर्मास ऐतिहासिक ठरेल. अमित ज्योतीजी यांच्या सान्निध्याचा व मार्गदर्शनाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. १० जुलैपासून चातुर्मास प्रारंभ होत असून दररोज व्याख्यान व धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या सर्व कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

अमित ज्योतीजी म.सा. यांनी मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, जैन परंपरेत चातुर्मासाला खूप महत्त्व आहे. प्रत्येकाच्या मनातील अंधकार दूर होवून जपतप, उपवास करून आत्मशुध्दी करण्याची संधी याकाळात मिळते. महावीरनगर येथील स्थानकात भाविकांचा अपूर्व उत्साह पहायला मिळतो. सर्व कार्यक्रमात सर्वांनी सहकुटुंब सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

चातुर्मास चार महिने चालणार असून सावेडी, हडको, बोल्हेगाव, नागापूर व उपनगरातील भाविकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन सेक्रेटरी अशोक बलदोटा यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी नवकारशीची व्यवस्था करण्यात आली होती.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंटमध्ये २३ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

नगर – विळद घाटातील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईन (सीएसडी) विभागाने यशाचा नवा शिखर गाठत विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत आयोजित कॅम्पस ड्राइव्हमध्ये एकूण ११ आघाडीच्या आयटी कंपन्यांनी सहभाग घेत २३ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड केली आहे.



विळद घाट येथील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस ड्राईव्ह मध्ये ११ आघाडीच्या आयटी कंपनी मध्ये २३ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड झाली. (छाया – विजय मते)

या प्रक्रियेत प्रथम विद्यार्थ्यांची योग्यता चाचणी, त्यानंतर तांत्रिक मुलाखती व अंतिम फेरीत प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. या प्रक्रियेतून सीएसडी विभागातील २३ विद्यार्थी यशस्वीरित्या निवडले गेले. विशेषतः कु. ऐश्वर्या काकडे हिची इन्फोसिसमध्ये, कु. आदिती कळमकर आणि ओम राऊत यांची एलटीआय माईंडट्री या मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये निवड होणे हे विभागासाठी अभिमानास्पद आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की, या यशाचे संपूर्ण श्रेय महाविद्यालयाच्या प्राध्यापक, संस्थेच्या प्रभावी मार्गदर्शनाला व पालकांच्या सततच्या पाठबळाला जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे यश नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

कॅम्पस ड्राइव्हमध्ये सहभागी झालेल्या प्रमुख कंपन्यांमध्ये इन्फोसिस (मुंबई/पुणे), कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी (पुणे/मुंबई), कोरिझो (बंगळुरू), न्युमेट्री टेक्नॉलॉजी, फॉर्च्यून क्लाऊड टेक्नॉलॉजीज, पार्श इन्फोटेक (नाशिक), सुदरलॅण्ड ग्लोबल सर्व्हिसेस, ईगल बाईट सोल्युशन (नाशिक), टेक्नोग्रोथ सॉफ्टवेअर सोल्युशन, क्युस्पायडर (पुणे/मुंबई) व द किरण अ‍ॅकेडमी (पुणे) या आयटी कंपन्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना सरासरी वार्षिक पॅकेज ₹४ लाखांपासून ते ₹६ लाखांपर्यंत देण्यात आले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील, डायरेक्टर जनरल–प्रशासन डॉ. पी.एम.गायकवाड, डायरेक्टर–टेक्निकल प्रा.सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ.रविंद्र नवथर, सीएसडी विभागप्रमुख डॉ. रविंद्र तांबे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. सुदर्शन दिवटे, विभाग समन्वयक प्रा.श्रीकांत गागरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# शहरात जिल्हा बॅडमिंटन निवड चाचणी व जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन

## वाडियापार्क येथे ९ जुलैपासून रंगणार तीन दिवसीय स्पर्धा

नगर – शहरात रायसोनी फाउंडेशनच्यावतीने योनेक्स सनराईझ जी. एच. रायसोनी मेमोरियल जिल्हा बॅडमिंटन निवड चाचणी व जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. ९, १० व ११ जुलै दरम्यान वाडियापार्क बॅडमिंटन हॉलमध्ये ही स्पर्धा आहे. अहमदनगर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.



स्पर्धा ११ वर्षे वयोगटापासून ते खुल्या गटापर्यंत असणार आहे. १७ व १९ वर्ष आतील मुले व मुली आणि खुला गट मुले व मुली यांची एकेरी व दुहेरी जिल्हा निवड चाचणी स्पर्धा आहे. ११, १३ व १५ वर्ष आतील मुले–मुली यांची एकेरी व दुहेरी जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा असणार आहे. स्पर्धेत जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग घेण्याचे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष अशोक कोठारी, उपाध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व सचिव मिलिंद कुलकर्णी यांनी केले आहे.

नाव नोंदविण्याची शेवट ७ जुलै संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असणार आहे. ही स्पर्धा फक्त अहिल्यानगर जिल्हा मधील खेळाडूंसाठी असणार आहे. महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या मार्गदर्शन व नियमानुसार ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी राज्य संघटनेकडून तांत्रिक समिती येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गुगल फॉर्म भरून आपला सहभाग नोंदवण्याचे म्हटले आहे. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी असोसिएशनचे सचिव मिलिंद कुलकर्णी यांच्याशी ९४२३१६२६३२ संपर्क साधण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



मुख्याध्यापक मुरलीधर रामदास अमृते यांना शिर्डी येथे बी द चेंज फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ प्रदान करताना प्रसन्न पवार, ओमप्रकाश (काका) कोयटे, पोलीस उपनिरीक्षक भरत दाते आदी.

# मुरलीधर अमृते यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ प्रदान

नगर – आदर्शगांव हिवरेबाजार येथील यशवंत माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मुरलीधर रामदास अमृते यांना शिर्डी येथे बी द चेंज फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.

मुरलीधर अमृते यांनी आपल्या २५ वर्षे सेवेच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर झाला होता. शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी राबविलेले उपक्रम, विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेत मिळविलेले सुयश शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. सन्मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार २९ जून रोजी शिर्डी येथे प्रसन्न पवार, ओमप्रकाश (काका) कोयटे, पोलीस उपनिरीक्षक भरत दाते, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, कोषाध्यक्ष व सर्व विश्वस्त बी द चेंज फाउंडेशन आदींच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

# फुटबॉल खेळाच्या वाढीसाठी मान्यताप्राप्त पंचाची भूमिका महत्त्वाची

## नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन; अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेच्यावतीने फुटबॉल रेफ्री प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन

नगर – फुटबॉल खेळाच्या वाढीसाठी खेळाडूंच्या विकासासोबतच सक्षम, निष्पक्ष आणि मान्यताप्राप्त पंचाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अशा उपक्रमांमुळे खेळाडूंसह पंचांची संख्या वाढते आणि त्यामुळे जिल्ह्यातील फुटबॉलचा दर्जाही उंचावत असल्याचे प्रशिक्षणाच्या उद्घाटनाप्रसंगी नरेंद्र फिरोदिया यांनी सांगितले.



अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटना आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ३ दिवसीय फुटबॉल पंच (रेफ्री) प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ झाला.

अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटना आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ३ दिवसीय फुटबॉल पंच (रेफ्री) प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ झाला आहे. या शिबिराला युवक–युवतींचा प्रतिसाद मिळाला आहे. याचे उद्घाटन जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले. यावेळी अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नोएल पारगे, फिजिकल डायरेक्टर डॉ. सॅवियो वेगास, जिल्हा फुटबॉल संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, सचिव रौनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ आदी उपस्थित होते.

अहमदनगर महाविद्यालय येथे हे प्रशिक्षण सुरु असून, युवकांमध्ये फुटबॉलची आवड वाढवण्यासह, प्रशिक्षित आणि पात्र रेफ्री तयार करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकून या शिबिराजे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा फुटबॉल संघटनेमार्फत आयोजित करण्यात आलेले हे दुसरे प्रशिक्षण शिबिर आहे. यामध्ये जिल्ह्यातील विविध भागातून २५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले असून, त्यांना फुटबॉल नियमांचे सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये थियरी बरोबरच प्रत्यक्ष मैदानावर प्रात्यक्षिके, निर्णय क्षमतेचा विकास तसेच रेफ्रीच्या भूमिकेतील जबाबदाऱ्या यांचे प्रशिक्षण समाविष्ट आहे.

प्रशिक्षण वर्गाला अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ) मान्यताप्राप्त प्रशिक्षक रमेश सुब्रमण्यम आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल संघटनेचे रेफ्री प्रमुख आणि कार्यकारिणी सदस्य धनराज मोरे (मुंबई) हे मार्गदर्शन करत आहेत. प्रशिक्षणाच्या शेवटी सहभागी उमेदवारांची लेखी, प्रात्यक्षिक आणि शारीरिक क्षमता चाचणी घेतली जाणार आहे. यामध्ये यशस्वी ठरलेल्या उमेदवारांना मान्यताप्राप्त रेफ्री लायसन्स दिले जाणार आहे. तसेच जिल्हा फुटबॉल संघटनेमार्फत अहमदनगर महाविद्यालयाकडून मिळालेल्या सहकार्य व उत्कृष्ट सुविधा आणि नियोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. रजनीश बार्नबस आणि सचिव विशाल बार्नबस यांचे आभार मानण्यात आले.

# देशाच्या सैनिकांची सेवा ही ईश्वर सेवा

## ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे प्रतिपादन; भारतीय सैन्य दलातील उमेश लोटके यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरवपूर्ण सन्मान

नगर – देशाचे सैनिक करत असलेली देश सेवा ही ईश्वर सेवा आहे. उमेश लोटके यांनी आहोरात्र हीच ईश्वर सेवा केली. त्यांनी सीमेवर राहून आपल्या आई, वडील, पत्नी, मुले यांची सेवा केली, एक शेतकरी गरीब कुटुंबातील पुत्र सीमेवर जाऊन आपल्या देशाचे रक्षण करतो, ही खूप मोठी गोष्ट आहे. आपल्या गरीबीवर मात करून १७ वर्ष सीमेवर काढली यांच्यावर संस्कार करणारे आई–वडील पुण्यवंत असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी सांगितले.



भारतीय सैन्या मधून (बॉम्बे इंजिनिअर ग्रुप खडकी १०६ रेजिमेंट) नगर तालुक्यातील खंडाळा येथील उमेश चंद्रभान लोटके यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

भारतीय सैन्यामधून (बॉम्बे इंजिनिअर ग्रुप खडकी १०६ रेजिमेंट) नगर तालुक्यातील खंडाळा येथील उमेश चंद्रभान लोटके सेवानिवृत्त झाले आहे. त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त अरणगाव ते खंडाळा त्यांची मिरवणूक काढण्यात आली. तर ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

उमेश यांनी भारतीय सैन्यात १७ वर्षे देश सेवा केली. देशातील लेह, लदाख, पालमपूर, पंजाब, जयपुर, जोधपुर, पुणे येथे सेवा बजावून ते नुकतेच निवृत्त झाले आहेत. ग्रामस्थांच्या वतीने त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरवपूर्ण सन्मान करण्यात आला. उद्योजक राहुल चंद्रभान लोटके, खंडाळा, खडकी, वाळकी, अरणगाव, बाबर्डी, नगरशहर सर्व सरपंच, ग्रामस्थांच्या वतीने या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

पुढे इंदुरीकर महाराज यांनी आई–वडिलांच्या प्रेरणा व संस्काराने माणूस मोठा होऊ शकतो. आजच्या काळातील आई–वडील मुलांना आपल्या हाताच्या फोड प्रमाणे जपतात. पण संस्कार देण्यामध्ये मागे पडत आहेत. कोट्यावधी रुपयांचे बंगले असणारे सुखी–समाधानी नाही. समाधानी रहायचं असेल तर देवा पेशा आपल्या आई–वडील ची सेवा करण्याचे त्यांनी आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी भानुदास कोतकर, आमदार काशिनाथ दाते, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, सागर बेग, पारनेर तालुका अध्यक्ष राहुल पाटील, नगर तालुकाध्यक्ष दीपक कार्ले, जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, सुखा पवार, योगेश ठुबे, शंकर पवार, शिवा मोरे, गुलाब कार्ले, सरपंच, जि.प. सदस्य, पंचायत समिती सदस्य आदी उद्योजक आणि व्यावसायिक उपस्थित होते.



ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाच्या वतीने अकोले येथील महर्षी अगस्त्यमुनी पायी दिंडीचे स्वागत करून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल सहस्रबुद्धे लिखित ‘ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार’ आणि ‘समाधी साधना’ या ग्रंथाचे समर्पण दिंडीतील अगस्त्यमुनींच्या चरणी करण्यात आले.

# ग्रंथ समर्पणाने केले महर्षी अगस्त्यमुनींच्या दिंडीचे स्वागत

**अहिल्यानगराच्या ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाचा उपक्रम**

नगर – अकोले येथील महर्षी अगस्त्यमुनी देवस्थानच्या पायी दिंडीचे अहिल्यानगरमध्ये आगमन झाल्यावर बोल्हेगाव येथे राघवेंद्र स्वामी मंदिरात ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाच्या वतीने भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.

यावेळी ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाच्या साधक मंडळींनी श्री संत ज्ञानेश्वर सप्तशतकोत्तर स्वर्णम होत्सवी जयंती पर्वाच्या निमित्ताने वर्गाचे आचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे लिखित व वीहा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ‘ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार’ आणि ‘समाधी साधना’ ग्रंथांचे समर्पण दिंडीमध्ये केले. हा ग्रंथ श्री ज्ञानेश्वरी लेखन सप्तशताब्दी वर्षात कांचीकामकोटी पीठाच्या जगद्गुरु शंकराचार्य यांच्या वतीने विद्वत पुरस्काराने गौरवला गेला आहे.

याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष अ‍ॅड. के. डी. धुमाळ, पायी दिंडीचे अध्यक्ष ह.भ.प. राजेंद्र महाराज नवले, देवस्थानचे विश्वस्त ह.भ.प. दीपक महाराज देशमुख, ह.भ.प. गणेश महाराज व दिंडीतील सहभागी वारकरी मंडळी उपस्थित होते. ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाचे प्रा.डॉ.मच्छिंद्र मालुंजकर, डॉ. राजू रिक्कल, राम विद्यासागर, भीमराज पटारे, मीरा पटारे, इंदु खेडकर, संजय खेले, दत्ता भालेराव, उल्हास घोडके, ऋता ठाकूर, शंकर ठुबे, प्रा. रंगराव भामरे, सयाजी कचरे, दादासाहेब वढावकर, उषा सहस्रबुद्धे आदी ज्ञानेश्वरी अभ्यासक उपस्थित होते.

# एकल महिलांना सर्व योजनात प्राधान्य द्यावे

## उपसभापती निलम गोऱ्हेंचे निर्देश; साऊ एकल समितीचे जिल्हाध्यक्ष अशोक कुटे यांची माहिती, विधान भवनात पार पडली बैठक

नगर – महिलांना विविध योजनांचा लाभ देणाऱ्या विविध शासकीय विभागांशी समन्वय साधून एकल महिलांची माहिती संकलित करावी. याआधारे एकल महिलांना प्राधान्याने विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासंदर्भात जिल्ह्यांचे पालक सचिव आणि संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत अभियान राबविण्याचे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी दिले आहेत, अशी माहिती साऊ एकल महिला समितीचे जिल्हाध्यक्ष अशोक कुटे यांनी दिली आहे.



विधानभवनात उपस्थित नीलमताई गोरे यांच्या अध्यक्षतेखाली अधिकारी व साऊ समितीचे पदाधिकारी.

महाराष्ट्रातील एकल महिलांचे सर्वेक्षण, रोजगार संधी व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचे प्रलंबित अनुदान याबाबत उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी शनिवारी दुपारी आपल्या दालनात मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी महाराष्ट्र साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी, राज्य समन्वयक मिलिंदकुमार साळवे, जिल्हाध्यक्ष व जगदंब फाउंडेशनचे सचिव अशोक कुटे, विद्या गडाख, सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर मुख्य सचिव व्ही. राधा, दिल्लीतील महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आर. विमला, महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे, अवर सचिव दीपाली तिडके, उपायुक्त राहुल मोरे, कक्ष अधिकारी निलेश पाटील, सुवर्णा पवार, रोहयो उपसचिव अतुल कोदे, आदिवासी विकास विभागाचे सहसचिव मच्छिंद्र शेळके, अविनाश रणखांब आदी उपस्थित होते.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या, अविवाहित अशा एकल महिलांना सामाजिक आणि आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांच्या सन्मान, सुरक्षेचा प्रश्न महत्वाचा आहे. आत्मसन्मान, स्वाभिमान, कायदेशीर जागृती, मालमत्ता स्वातंत्र्य याबाबत ठोस उपाययोजना राबवावी. यासाठी शाश्वत विकास उद्दिष्टांवर काम करणे आवश्यक आहे.

एकल महिलांना ओळखपत्र दिल्यास पोलीस स्थानकामार्फत सुरक्षा आणि रुग्णालयात वैद्यकीय सुविधा प्राधान्याने देणे सुलभ होईल. ग्रामीण भागातील महिलांच्या मालमत्तेचे जबरदस्तीने हस्तांतरण होऊ नये यासाठीही उपाययोजना आवश्यक आहे.

ग्रामीण आणि शहरी भागातील एकल महिलांच्या रोजगार संदर्भातील समस्या वेगळ्या असल्याने प्रदेशाप्रमाणे त्या जाणून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही उपसभापतींनी सांगितले.

हेरंब कुलकर्णी यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात झालेल्या एकल महिला सर्वेक्षणाच्या धर्तीवर संपूर्ण राज्यभरातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरण आखण्याची गरज व्यक्त केली. मिलिंदकुमार साळवे यांनी गेल्या दोन वर्षांपासून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचे प्रस्ताव व अनुदान रखडले असल्याकडे डॉ. गोऱ्हे यांचे लक्ष वेधले. साऊ एकल महिला समितीचे अहिल्यानगर जिल्हा समन्वयक अशोक कुटे यांनी एकल महिलांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न मांडला.

आयुक्त नयना गुंडे यांनी आदिशक्ती अभियानांतर्गत विविध विभागाच्या माध्यमातून महिलांसाठी विविध योजना राबविणार असल्याचे सांगितले.

राज्यातील एकल महिलांसाठी सुरक्षा, रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाबाबत धोरणात्मक उपाययोजना अंमलात आणणे आवश्यक आहे. यासाठी महसूल, अन्न व नागरी पुरवठा, महिला व बालविकास विभाग, आरोग्य, रोजगार हमी योजना आणि ग्रामविकास विभागामार्फत एकल महिलांची माहिती संकलित करून, त्यांना प्राधान्यक्रम देणाऱ्या योजना राबवाव्याचा मानस व्ही. राधा यांनी व्यक्त केला.

### पुढील धोरण ठरविण्यासाठी विभागीय कार्यशाळा

जिल्हा नियोजन समितीस महिला व बाल कल्याणासाठी दिला जाणारा निधी एकल महिलांसाठी वापरण्याची सूचना डॉ. गोऱ्हे यांनी केली. तसेच एकल महिलांविषयक धोरण आखण्यासाठी विभागीय स्तरांवर कार्यशाळा घेण्याचे निर्देशही उपसभापतींनी दिले.




## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त डॉ. अमोल बागुल यांनी रेखाटला रांगोळीचा असुबा पॅटर्न

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त येथील कलाकार डॉ. अमोल बागुल यांनी रांगोळीचा असुबा पॅटर्न रेखाटला असून ही रांगोळी ४० बाय ४० फूट, १२५ किलो रंग, २७ प्रकारचे रंग, सर्व सुगंधी रंग वापरत सहा तासात ही रांगोळी काढली आहे. तसेच या रांगोळीत मनपाच्या बोधचिन्हासह महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या त्रिजन्मशताब्दीच्या लोगोसह स्वच्छ अहिल्यानगर, सुंदर अहिल्यानगर, आपलं अहिल्यानगर निरंतर सेवा, या घोषवाक्यांचा वापर केला आहे. तसेच मुख्य रांगोळीसह मनपा इमारतीच्या आवारातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासह परिसरात रांगोळीच्या पायघड्या टाकल्या आहे.

# मोहरमच्या पार्श्वभूमीवर सुविधा उपलब्ध करुन द्या

## दर्गाह हजरत पीर बारा इमाम कोठला ट्रस्टची मागणी; निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

नगर – शहरातील मोहरमच्या पार्श्वभूमीवर भाविकांसाठी सोयी–सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या मागणीचे निवेदन दर्गाह हजरत पीर बारा इमाम कोठला ट्रस्टच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांच्याकडे करण्यात आली आहे. यावेळी चेअरमन सय्यद दस्तगीर बडेसाब, खजिनदार जुबेर सय्यद, विश्वस्त शकूर शेख, अ‍ॅड. नजीर खान, सय्यद निसार बडेसाब, अ‍ॅड. फारुक शेख, खालिद सय्यद आदी उपस्थित होते.



मोहरमच्या पार्श्वभूमीवर भाविकांसाठी सोयी–सुविधा उपलब्ध करुन द्या या मागणीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देताना सय्यद दस्तगीर बडेसाब, खजिनदार जुबेर सय्यद, विश्वस्त शकूर शेख, आदी

मोहरममध्ये सर्वधर्मिय सहभागी होतात. दरवर्षीप्रमाणे जिल्हा प्रशासनाने महापालिकेच्या माध्यमातून भाविकांच्या सोयी–सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

पाच दिवसासाठी जनरेटरची व्यवस्था बारा इमाम कोठला येथे करुन द्यावी, सवारी मार्गावर डांबरीकरण व रोडची पॅचिंग करून द्यावी, सवारी मार्गावर लाईटची व्यवस्था करावी, मोहरमची नऊवी तारीख म्हणजे ५ जुलै रोजी कत्तलच्या रात्री सवारीच्या पाठीमागे विद्युत रोषणाईसाठी जनरेटरची व्यवस्था करावी, बारा इमाम कोठला मधील दर्गाजवळची विहीरची स्वच्छता करावी, कोठला परिसरातील जागेची सफाई करुन दर्गाच्या आत पाच दिवसासाठी वेगळे जनरेटर उपलब्ध करून द्यावे. तसेच मोहरमच्या पाच दिवसात प्रत्येक चौकात विविध धार्मिक कार्यक्रम, सरबत व भंडाराचे आयोजन केले जात असून, शहरात पाणी, स्वच्छता, फिरते शौचालय आदी सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी ट्रस्टच्या वतीने करण्यात आलेली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा निकाल नुकताच लागला आहे. न्यायालयाच्या आदेशान्वये मुस्लिम वक्फ बोर्डने सदर ट्रस्टला उत्सव साजरा करण्याची अधिकृत परवानगी दिलेली आहे. ट्रस्टच्या परवानगीशिवाय कोणीही कोठला परिसरात अनाधिकृतपणे स्टॉल लावू नये व पावत्या देखील फाडू नये अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाणार आहे, असे सय्यद दस्तगीर बडेसाब यांनी सांगितले.

# मुख्याध्यापक शिवाजी लंके यांची बदली रद्द करा अन्यथा आंदोलन

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेतील पालकांचा संतप्त सूर

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विभागाचे कार्यरत मुख्याध्यापक शिवाजी लंके यांची अचानक बदली करण्यात आल्याने शाळेतील पालक वर्गात संतापाची लाट उसळली आहे. संस्थेच्या या निर्णयाविरोधात पालकांनी एकत्र येऊन आपत्कालीन बैठक घेऊन लंके सरांची बदली तात्काळ रद्द करण्याची मागणी केली.



मुख्याध्यापक शिवाजी लंके यांची बदली रद्द करावी या मागणीसाठी पालकांची बैठक झाली.

लंके हे गेल्या अनेक वर्षांपासून या शाळेत कार्यरत असून त्यांच्या दूरदृष्टी, काटेकोर प्रशासनशैली, विद्यार्थ्यांप्रती कळकळ, व परिणामकारक नेतृत्वामुळे शाळेने शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात भरीव यश संपादन केले आहे. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेले उपक्रम, मार्गदर्शन आणि कौशल्यवर्धनाच्या योजना यामुळे पालकवर्ग व ग्रामस्थांमध्ये त्यांच्याविषयी मोठा विश्वास निर्माण झाला आहे. लंके सरांचं या शाळेत असणं म्हणजे आमच्या मुलांच्या भवितव्यासाठी संरक्षण आहे. त्यांच्या जाण्याने शाळेचा पाया कमकुवत होईल अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या आहेत.

या संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस पालक उपस्थित होते. यामध्ये पालक प्रतिनिधींनी आपल्या भावना मांडत, संस्थेच्या कार्यकारिणीला दिलेल्या निवेदनात, लंके यांच्या बदलीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार असून, ही बदली मागे घेण्यात यावी, अन्यथा आंदोलनात्मक पावले उचलावी लागतील, अशा इशारा देण्यात आला आहे. तर पालकांनी संघटित पद्धतीने मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. गुणवंत शिक्षकांवर अन्याय झाला, तर शिक्षण संस्थेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. संस्थेच्या निर्णयप्रक्रियेत पालकांची भावना महत्त्वाची आहे. माजी विद्यार्थ्यांनी देखील सोशल मीडियाच्या माध्यमातून लंके सरांच्या बदलीविरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केली असून, या विषयाने आता व्यापक स्वरूप धारण केले असून, बदली रद्द होत नाही तोपर्यंत हे वाद अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहे.

# निवडणुकांमध्ये भाजप सोडून समविचारी पक्षांबरोबर वंचित बहुजन आघाडी जाणार

## सन्मानपूर्वक वागणुक न मिळाल्यास सर्व निवडणुका स्वबळावर : प्रा. किसन चव्हाण

नगर – शहरातील शासकीय विश्रामगृह येथे वंचित बहुजन आघाडीच्या दक्षिण विभागातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक पार पडली. यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप सोडून इतर समविचारी पक्षांबरोबर वाटाघाटी करुन निवडणुका लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तर वाटाघाटी करताना सन्मानपूर्वक वागणुक न मिळाल्यास स्वबळावर सर्व निवडणुकांना सामोरे जाण्याचे देखील सुतोवाच करण्यात आले.

आघाडीचे राज्य महासचिव प्रा. किसन चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ही आढावा बैठक पार पडली. याप्रसंगी राज्य प्रवक्ते अ‍ॅड. अरुण जाधव, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, शहराध्यक्ष हनीफ शेख, अ‍ॅड. योगेश गुंजाळ, प्रवीण ओरे, कल्याणराव भागवत, सुधीर ठोंबे, श्रीकांत बोर्डे, भीमराव शिंदे, सुरज क्षेत्रे, अशोक भिंगारदिवे, चंद्रभान भिंगारदिवे, उमेश मंडलिक, भाऊसाहेब जावळे, हिरामण भिंगारदिवे, यशवंत शिरसाठ, शंकर भिंगारदिवे, अरुण झांबरे, शाहूराव खंडागळे, आतिश पारवे, पोपट शेटे, रंजन मेघडबर, योगेश गायकवाड, महेश पवार, संतोष जंजाळ, रूपाली आढाव, पि.के. गवारे, जोसेफ शिरसाठ, प्यारेलाल शेख, रवींद्र निळ, पोपट थोरात, राहुल अडसूळ, दादा समुद्र, राजीव भिंगारदिवे, राहुल पोळ आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



आघाडीचे राज्य महासचिव प्रा. किसन चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील शासकीय विश्रामगृह येथे वंचित बहुजन आघाडीच्या दक्षिण विभागातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक पार पडली.

प्रा. किसन चव्हाण म्हणाले की, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशान्वये भाजप सोडून समविचारी पक्षांबरोबर आघाडी केली जाणार आहे. परंतु नेहमीप्रमाणे समविचारी पक्षांनी आपल्याला वापरून आणि ढोपरून घेण्याचा विचार केल्यास स्वबळावर सर्व निवडणुकांना सामोरे जाण्याची देखील तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.

अ‍ॅड. अरुण जाधव म्हणाले की, येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडीची ताकद दिसणार आहे. गाव तेथे शाखा सुरु करुन पक्षाची बांधणी सुरू झाली आहे. दोन महिन्याचा कृती आराखडा कार्यकर्त्यांना देण्यात आला असून, सर्व कार्यकर्ते कामाला लागले आहे. योगेश साठे यांनी जिल्ह्यात जोमाने पक्ष बांधणीचे कार्य सुरु असून, कार्यकर्ते झोकून काम करत आहे. जातीयवादी शक्तींबरोबर न जाता, बहुजन समाजाला बरोबर घेऊन सत्तेत स्थान मिळवण्याचे काम केले जाणार असल्याचे स्पष्ट केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना कसे सामोरे जावे? यासाठी कार्यकर्त्यांचा आढावा घेण्यात आला. सर्व तालुका पदाधिकारी यांनी आपल्या सूचना मांडून पक्षाच्या आदेशान्वये एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या बैठकीत रविकिरण जाधव यांची नगर तालुकाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

# नामांतर झाले तरी पासपोर्ट कार्यालयाच्या संकेतस्थळावर अजूनही अहमदनगर आणि औरंगाबाद असाच दोन्ही शहरांचा आहे उल्लेख

## दुबईस्थित शैलेश बिहाणी मोहजदेवढेकर यांनी पत्राद्वारे वेधले मुख्यमंत्र्यांचे लक्ष

नगर – अहमदनगरचे अहिल्यानगर आणि औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर असे या शहरांचे नामकरण बराच कालावधी लोटला असला तरी पासपोर्ट कार्यालय मात्र याबाबत अनभिज्ञ असून त्यांच्या संकेतस्थळावर अजूनही दोन्ही शहरांचा उल्लेख पूर्वीचाच असल्याची बाब दुबई स्थित शैलेश बिहाणी मोहजदेवढेकर यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

अडीच वर्षांपूर्वी आघाडीचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातील शेवटच्या दिवशी औरंगाबादच्या नामांतराचा ठराव मंत्रिमंडळाच्या शेवटच्या बैठकीत मांडून संभाजीनगर असे केले. त्यांच्यानंतर बहुमताने सत्तेवर आलेल्या महायुतीचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच पुन्हा एकदा मंत्रिमंडळाची बैठक घेऊन औरंगाबाद शहराचे नामांतर छत्रपती संभाजीनगर असे केले. त्यासाठी केंद्रामध्ये प्रस्ताव पाठवून केंद्राची मंजुरीही मिळवली. एसटी महामंडळासह सर्वच शासकीय पाट्या आणि दप्तर या ठिकाणी छत्रपती संभाजीनगर असा उल्लेख होऊ लागला. सरकारच्या या निर्णया विरोधात अनेक मंडळींनी कोर्टामध्ये याचिका दाखल केल्या. परंतु लोकशाही मार्गाने आणि कायदेशीररित्या छत्रपती संभाजीनगर असे नामकरण रूढ होत आहे. न्यायालयाने हे त्यावर शिक्कामोर्तब केलेले आहे.

अशीच परिस्थिती अहमदनगर या शहराच्या नामांतराबाबत आहे. भाजपचे नेते राम शिंदे आणि पडळकर अहमदनगर जिल्ह्याचे अहिल्यानगर असे नामांतर करण्याची मागणी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना पुढे रेटली. इंदूरच्या महाराणी असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यात झाला असल्यामुळे त्यांचेच नाव अहमदनगर जिल्ह्याला देण्याची मागणी अनेक मंडळी सातत्याने करत होती. रयतेला सुख आणि सुविधा प्राप्त व्हाव्यात म्हणून अहिल्यादेवींनी ठिकठिकाणी धर्मशाळा उभारल्या. उन्हाळ्यात आणि विशेषता दुष्काळामध्ये तहानलेल्या रयतेला आणि गाई गुरांना पिण्यासाठी पाणी मिळावे, म्हणून त्यांनी अनेक गावातून विहिरी आणि बाराव खोदून त्यांची बांधकामे केली. रस्ते बांधले, रस्त्याच्या कडेने झाडे लावली.

स्वतः वैराग्य पत्करून लोकांच्या सुख सोयीसाठी आयुष्यभर झटणार्या पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे नाव अहमदनगर जिल्ह्याला देण्याचे मागणी होताच त्याला जिल्ह्यातीलच नव्हे तर जिल्ह्याबाहेरील जनतेतून उत्स्फूर्त समर्थन दिले आणि जनतेच्या मनातली इच्छा ओळखून फडणवीस आणि शिंदे सरकारने अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर असे केले. प्रशासकीय पातळीवरती ही कार्यवाही पार पडत असताना संभाजीनगर सारखा विरोध अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये झाला नाही आणि प्रक्रिया सुरळीत पार पडली गेली.

मात्र भारताच्या परराष्ट्र खात्यातील पासपोर्ट विभागातील बहुतेक सर्वच अधिकारी यांच्यापर्यंत मात्र ही माहिती अजूनही पोहोचलेली दिसत नाही. नागरिकांना पासपोर्ट काढण्यासाठी त्यांच्याकडून अपडेट कागदपत्रांची मागणी करणारे पासपोर्ट कार्यालय स्वतः मात्र अपडेट होण्याचे टाळताना दिसून येत आहे. अजूनही या कार्यालयातील कागदपत्रावर औरंगाबाद आणि अहमदनगर या शहरांचा उल्लेख होताना दिसत आहे. यामागील शोध घेण्याची विनंती करणारे पत्र दुबईतील एका कंपनीचे अधिकारी शैलेश बिहाणी मोहजदेवढेकर यांनी दुबईतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेले आहे.

पासपोर्ट कार्यालयाच्या अनभिज्ञतेबद्दल मुख्यमंत्र्यांना माहिती देऊन ते पुढे म्हणतात, आपल्या तेजस्वी अशा कार्यकाळामध्ये शहराच्या नामांतराबाबत घेतलेल्या निर्णयाची माहिती भारताच्या पासपोर्ट विभागास अवगत करून देण्यात यावी, जेणेकरून त्यांच्या संकेतस्थळावर औरंगाबाद आणि अहमदनगर ही शहरांची बदललेली नावे त्वरित हटवण्यात येऊन संकेतस्थळ अपडेट करण्यात यावे. महाराष्ट्राचे तरुण आणि तडफदार मुख्यमंत्री या संवेदनशील प्रकरणात लवकरच लक्ष घालतील अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त करण्यात येत आहे.

# पावसाळ्यात साथीचे आजार रोखण्यासाठी उपाययोजना करा

## साथीचे आजार परसण्याची वाट पाहू नये : मनपा आरोग्य अधिकारी यांना निवेदन

नगर – शहरात पावसाळा सुरू झाल्यानंतर डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी रोहित सरना, राजू मकासरे, कृष्णा शेळके, दीपक वाघ, ऋषीकेश जगताप, ओमकार मिसाळ, स्वप्निल कांबळे, किरण घुले, गौरव हरबा, मंगेश शिंदे, अमित बडे, अशुतोष पानमळकर आदी उपस्थित होते.



पावसाळ्यात साथीचे आजार रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात यासाठी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांना निवेदन देण्यात आले.

शहरातील विविध भागांत पावसाचे पाणी साचल्याने दूषित पाणी व डासांची उत्पत्ती यामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. शहर व उपनगरातील विविध कॉलनीत पाणी साचणे, निर्माण झालेले डबके आणि नाले तुंबल्यामुळे डासांची संख्या वाढली आहे. या परिस्थितीमुळे डेंग्यू, चिकनगुनिया आणि मलेरिया यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. डास निर्मूलनासाठी शहर व उपनगरातील आवश्यक असलेल्या भागांमध्ये धूर फवारणी करणे, साचलेल्या पाण्याच्या ठिकाणी औषध फवारणी करणे, साथीच्या आजारांचे नियंत्रण करण्यासाठी स्वतंत्र आरोग्य मोहीम राबविण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

साथीचे आजार परसण्याची वाट बघण्यापेक्षा त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज आहे. साथीचे आजार पसरल्यास सर्वसामान्य वर्गाला मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. पाऊसच्या प्रारंभीच मनपा आरोग्य विभागाने उपाययोजना केल्यास साथीच्या आजारांना अटकाव करता येणार आहे असे इंजि. केतन क्षीरसागर यांनी सांगितले.

## विश्व वारकरी परिषदेच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी साहेबराव पाचरणे



नगर – अखिल विश्व वारकरी परिषदेच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी चिचोंडी पाटील येथील साहेबराव पाचरणे यांची निवड करण्यात आली आहे.

नुकतीच पुणे येथे शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या अखिल विश्व वारकरी परिषदेच्या बैठकीत प्रदेश अध्यक्ष नितीन सातपुते यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.



मनपा प्रभाग क्रमांक १ मध्ये माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांच्या पुढाकारातून स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ झाला. यावेळी माजी नगरसेवक डॉक्टर सागर बोरुडे, भैय्या चव्हाण, किसन कजबे, किसन नांगरे आदीसह नागरिक व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

